**आजचा शुभ विचार**

“"बुद्धिमत्तेचा विकास हे मानवी अस्तित्वाचे अंतिम लक्ष्य असले पाहिजे"आपण नेहमी काहीतरी शिकत राहिले पाहिजे. आपले ज्ञान वाढविण्यावर भर दिला पाहिजे"
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते


DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-21 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thursday 22 May 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २१ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. २२ मे २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## प्रवेशाच्या पहिल्याच दिवशी 11 वी प्रवेशाचे संकेतस्थळ ठप्प
## राज्यभरात विद्यार्थी आणि पालकांमध्ये नाराजीचा सूर

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------

अकरावी प्रवेशाच्या प्रत्यक्ष अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला बुधवारी सकाळी सुरुवात झाली, मात्र प्रवेशाचे संकेतस्थळच ठप्प असल्याने विद्यार्थी व पालकांचा गोंधळ उडाला. या संदर्भात शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता संकेतस्थळाचे काम सुरू असून लवकरच संकेतस्थळ सुरळीत होईल, असे सांगण्यात आले. राज्यात यंदा दहावीच्या परीक्षेत १३ लाख २ हजार ८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. अकरावी प्रवेशासाठी राज्यामध्ये तब्बल २० लाख ९१ हजार ३९० जागा आहेत. या जागांसाठी २१ मे रोजीपासून प्रवेश प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली आहे. यंदा प्रथमच संपूर्ण राज्यामध्ये अकरावी प्रवेश प्रक्रिया




ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. यापूर्वी मुंबई पुणे-पिंपरी चिंचवड महानगरपालिका, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका, यांसारख्या काही ठराविक महानगरपालिकांमध्ये ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत होती. मात्र यंदापासून राज्यभर ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे राज्यभरातील प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडण्याबाबत शिक्षण तज्ज्ञांकडून शंका उपस्थित करण्यात येत होती. त्याची प्रचिती प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी आली आहे. बुधवारी सकाळी अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेशअर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ सुरू केले. मात्र संकेतस्थळ ठप्प असल्याचे आढळून येत होते. संकेतस्थळावर सुरुवातीला '५०२ बॅड गेटवे' असा संदेश येत होता. त्यानंतर दुपारी संकेतस्थळावर 'संकेतस्थळाचे काम सुरू' असा संदेश येत होता. त्यामुळे सकाळपासून सायबर कॅफे किंवा घरातील संगणकासमोर बसलेल्या विद्यार्थ्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

> संकेतस्थळाचे थोडे तांत्रिक काम सुरू असल्याने ते बंद ठेवण्यात आली आहे. हे काम लवकरच पूर्ण होऊन संकेतस्थळ सुरू करण्यात येईल.
> **महेश पालकर, संचालक, शिक्षण संचालनालय**

**मदत क्रमांकही निरुपयोगी ?**

संकेतस्थळावर देण्यात आलेल्या मदत क्रमांकावर (हेल्पलाईन) पालक व विद्यार्थी सातत्याने संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र बहुतेकांचा संपर्क झालाच नाही. कोणतेही उत्तर मिळाले नाही. त्यामुळे नेमके काय झाले आहे, याची काहीच कल्पना पालक व विद्यार्थ्यांना येत नसल्याने काय करावे असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

## “वक्फ हा मुस्लीम धर्मादाय प्रकार असून इस्लामचा अविभाज्य घटक नाही”, केंद्राचा सुप्रीम कोर्टात युक्तिवाद

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत
--------------------

वक्फ दुरुस्ती कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांच्या सुनावणी दरम्यान केंद्र सरकारने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, वक्फ हा धर्मादाय प्रकार असून इस्लामचा अविभाज्य भाग नाही. वक्फ बोर्ड केवळ धर्मनिरपेक्ष कार्ये करतात हे अधोरेखित करून, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, मंदिरेही केवळ धार्मिक असली तरी त्यांचे प्रशासन मुस्लिम व्यक्तीकडे असू शकते, कारण ती वक्फसारखी नाहीत. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी पुढे सांगितले की, “वक्फ ही एक इस्लामिक संकल्पना आहे. पण ती इस्लामचा अविभाज्य भाग नाही. वक्फचा इस्लाममध्ये अर्थ फक्त दान असा होतो. यापूर्वीच्या न्यायालयीन निकालांवरून



असे दिसून येते की, दान हा प्रत्येक धर्माचा भाग आहे. हिंदू आणि ख्रिश्चन धर्मासह शिखांमध्येही दान करण्याची व्यवस्था आहे.” या प्रकरणात मुस्लिम पक्षाने काल आपले म्हणणे मांडल्यानंतर आज सरकारतर्फे युक्तिवाद करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, “वादग्रस्त 'वक्फ-बाय-युजर' तत्त्वानुसार वक्फ घोषित केलेल्या मालमत्ता पुन्हा मिळवण्याचा केंद्र सरकारला कायदेशीररित्या अधिकार आहे.” नवीन कायद्यात 'वक्फ-बाय-युजर' ही तरतूद रद्द करण्यात आली आहे, त्यामुळे औपचारिक कागदपत्रांशिवायही, धार्मिक आणि धर्मादाय हेतूंसाठी दीर्घकालीन वापराच्या आधारावर मालमत्तेला वक्फ म्हणून मानले जाऊ शकते. वक्फ मालमत्तेचे नियमन करण्यासाठी सरकारी देखरेख वाढवणाऱ्या वक्फ कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय सुनावणी करत असताना मेहता यांनी हा युक्तीवाद केला.“ सरकारी जमिनीवर हक्क सांगण्याचा कोणालाही अधिकार नाही. सर्वोच्च न्यायालयाचा एक निकाल आहे ज्यामध्ये म्हटले आहे की, जर ती मालमत्ता सरकारची असेल आणि वक्फ म्हणून घोषित केली गेली असेल तर सरकार परत मिळवू शकते,” असेही मेहता यांनी मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायाधीश ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सांगितले.केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला असेही सांगितले की, वक्फ कायद्यातील नवीन सुधारणांमुळे अशा समस्या सोडवण्यात आल्या ज्या ब्रिटिश आणि त्यानंतरच्या भारतीय सरकारांना सोडवता आल्या नव्हत्या. “ आम्ही १९२३ पासून अस्तित्वात असलेल्या धोक्याचे उच्चाटन करत होतो. कायद्यात सुधारणा करताना प्रत्येकाचे म्हणणे ऐकण्यात आले. काही याचिकाकर्ते संपूर्ण मुस्लिम समुदायाचे प्रतिनिधित्व करत असल्याचा दावा करू शकत नाहीत” , असे सॉलिसिटर जनरल म्हणाले.

## विलवडे येथे कोसळलेली दरड हटविण्यात कोकण रेल्वेला यश, कोकण रेल्वे मार्गावर तीन तास उशिराने वहातूक सुरु

सुनील बाचरे
अंबरनाथ प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------

रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार कोसळलेल्या पावसाचा कोकण रेल्वेला मोठा बसला होता. वेरवली – विलवडे स्टेशन दरम्यान मंगळवारी संध्याकाळी दरड कोसळून कोकण रेल्वेची वहातूक विस्कळीत झाली होती. मात्र तीन तासाच्या प्रयत्नाने दरड हटवण्यात रेल्वे प्रशासनाला यश आले. रात्री उशिरा सर्व गाड्या मार्गस्थ करुन वाहतूक पूर्ववत करण्यात आल्याची माहिती कोकण रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी



सचिन देसाई यांनी दिली. राज्याच्या हवामान खात्याने वादळी वा-यासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला होता. मंगळवारी दुपार पासून रत्नागिरी जिल्हा परिसरात मुसळधार पावसाला सुरुवात झाली. त्यात संध्याकाळी पावसाचा जोर आणखीनच वाढला. याचा फटका कोकण रेल्वेला बसला. वेरवली ते विलवडे स्टेशन दरम्यान संध्याकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान दरड कोसळली. रुळावरच दरड कोसळल्याने कोकण रेल्वची वाहतूक तीन तासांसाठी ठप्प झाली होती. अनेक गाड्या कोकण रेल्वे मार्गावरील ठीक ठिकाणांच्या रेल्वे स्थानकांमध्ये उभ्या करण्यात आल्या होत्या . पाऊस मुसळधार सुरू असल्याने वाहतूक केव्हा पूर्ववत होईल याचा अंदाज येत नव्हता. त्यानंतर रात्री उशिरा रेल्वे प्रशासनाकडून दरड हटवण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु करण्यात आले. या दरम्यान रेल्वे गाड्या ठिकठिकाणी थांबवून ठेवण्यात आल्या होत्या. मुसळधार पावसामुळे दरड हटविताना अडचणी येत होत्या. रात्री उशिरा दरड हटवण्यात येऊन तीन तासाने वाहतूक सुरू करण्यात आली. कोकण रेल्वे मार्गावरील सर्वच गाड्यां दीड तास विलंबाने धावत असल्याचे जनसंपर्क अधिकारी सचिन देसाई यांनी सांगितले.

## इलॉन मस्क यांच्या 'ट्रम्प प्रेमा'चा टेस्लाच्या विक्रीवर परिणाम; बड्या कंपन्या फिरवतायत टेस्लाकडे पाठ

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून बहुमान प्राप्त करणाऱ्या एलॉन मस्क यांच्या व्यवसायाला ट्रम्प संबंधाची झळ बसू लागली आहे. मस्क यांची टेस्ला ही कंपनी विजेवर चालणारी वाहने उत्पादित करते. या वाहनांना युरोप आणि अमेरिकेतून मोठी मागणी आहे. मात्र गेल्या काही काळात एलॉन मस्क यांची ट्रम्प यांच्याशी जवळीक वाढली. त्याचा फटका आता टेस्लाच्या वाहनविक्रीला बसला आहे. डेन्मार्कमधील आघाडीची बांधकाम कंपनी त्शेर्निंगने आपल्या ताफ्यातील टेस्लाच्या कार कंपनीला परत दिल्या आहेत. टेस्लाच्या वाहनांमध्ये कोणतीही कमरता नाही. पण एलॉन मस्क यांच्यामुळे वाहने परत करत आहोत, असे त्शेर्निंगने म्हटले आहे. युरोपमध्ये टेस्लाची लोकप्रियता कमी होत आहे. त्शेर्निंगच्या निर्णयामुळे या दाव्याला आणखी बळकटी



मिळत आहे. मस्क यांची राजकारणातील सक्रियता वाढल्यानंतर युरोपमध्ये टेस्लाची विक्री कमी झाली असून ब्रँड इमेजला धक्का बसला आहे. मस्क यांचा राजकारणातला सहभाग वाढल्यानंतर टेस्लाची विक्री तर कमी झालीच शिवाय ज्यांच्याकडे आधीपासूनच टेस्लाचे वाहन होते, त्यांनी ते विकण्यास सुरुवात केली आहे. टेस्ला ब्रँडपासून स्वतःला बाजूला करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. युरोपमधील कॉर्पोरेट विक्री हा टेस्लाची वाहने विक्री होण्याचा प्रमुख स्रोत आहे. मात्र मस्क यांच्याविरोधामुळे ही विक्री कमी झाल्याचे इलेक्ट्रेकच्या अहवालात म्हटले आहे. त्शेर्निंगप्रमाणेच युरोपमधील फार्मसी उत्पादनाची साखळी असलेल्या रॉसमन कंपनीनेही मागच्या वर्षी आपल्या ताफ्यातील टेस्लाच्या वाहनांची विक्री केली. तसेच रॉसमनने आपल्या निर्णयाबद्दलचा एक व्हिडीओही सार्वजनिक केला आहे.


**त्शेर्निंगने टेस्लाची वाहने परत देताना काय म्हटले?**

इलेक्ट्रेकला दिलेल्या प्रतिक्रियेत त्शेर्निंगने म्हटले की, आमच्या कंपनीत कोणत्या गाड्या चालवायच्या याबरोबरच कुणाच्या गाड्या चालवायचा, हाही निर्णय आम्ही घेतो. त्यामुळेच आमच्या कंपनीच्या टेस्ला वाहनांच्या चाव्या परत देण्याचा निर्णय घेण्यात आला. टेस्लाच्या गाड्या वाईट आहेत म्हणून हा निर्णय घेतलेला नाही. तर अलीकडच्या काळात एलॉन मस्क यांची वाढलेली राजकीय सक्रियता आणि त्यांच्या विधानांमुळे सदर निर्णय घेतला. तुमच्या राईडबद्दल धन्यवाद, एवढेच आता म्हणू इच्छितो. त्शेर्निंगने पुढे म्हटले की, राजकीय सक्रियता असलेल्या ब्रँडशी जोडले जाण्यापेक्षा आम्ही एखाद्या युरोपियन कंपनीच्या वाहनांना यापुढे पसंती देऊ. इलेक्ट्रेकच्या अहवालात टेस्लाच्या युरोपमधील व्यवसायासंदर्भातील स्थितीही दर्शविली गेली आहे. युरोपमध्ये टेस्लाची व्यावसायिक स्थिती अनिश्चित असून अनेक ठिकाणचे स्टोअर बंद करण्यात आले आहे. तर काही ठिकाणी कर्मचारी कपात करण्यात आली आहे. चालू वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहीत मागच्या तीन वर्षांच्या तुलनेतील सर्वात कमी वाहन विक्री झाल्याचेही समोर आले आहे.

## नाशिक जिल्ह्यात ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंदूर मोहिमेतून पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले. दोन्ही देशांकडून होणारे हल्ले थांबले असले तरी सतर्कतेच्या पार्श्वभूमीवर, ग्रामीण पोलिसांनी संपूर्ण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय शहर हद्द



वगळून) तीन जूनपर्यंत ड्रोन उड्डाणास प्रतिबंध (नो ड्रोन फ्लाय झोन) केला आहे. पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलमानुसार १६ मे ते तीन जून २०२५ या कालावधीत हे निर्बंध लागू केले आहेत. या आदेशान्वये महत्वाचे धार्मिक स्थळ, गर्दीची रेल्वे स्थानके, मॉल्स, औद्योगिक क्षेत्र या सर्व ठिकाणी ड्रोन, दूरसंवेदक नियंत्रित मायक्रोलाईट एअर क्राफ्ट, पॅराग्लायडर्स, पॅरा मोटरर्स, हॅंग ग्लायडर्स, गरम हवेचा बलून आणि तत्सम सर्व हवाई क्रियाकल्पांचा वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.


**शतायुषी हो बाळा..**

**दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....**

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

सम्पादकीय

# उत्कृष्टतेचा मार्ग खडतर, पण सोडू नये

काल्पनिक कालयानातबसून आपण भारतातच भूतकाळात जाऊन एका स्नातकाची हकीकत पाहू, महाकवी कालिदासाने रघुवंशातल्या पाचव्या सर्गात सांगितलेली कौत्स या स्नातकाची ती गोष्ट. गुरूकडून-वरतन्तुकडून विद्यार्जन करून कौत्स रघुराजाकडे येतो. त्याचे स्वागत करून रघू येण्याचे प्रयोजन विचारतो.

**तवार्हतो नाभिगमेन तृप्तं मनो**
**नियोगकृययोत्सुकं मे।**
**अप्याज्ञया शासितुरात्मना वा**
**प्राप्तोऽसि संभावयितुं वनान्माम्।।**

'आपणासारख्या पूज्य व्यक्तीच्या केवळ आगमनानेच माझे मन तृप्त झाले नाही. आपली सेवा करायची आहे. आपण वनातून माझ्याकडे येण्याची कृपा केलीत ती आपल्या गुरूच्या आज्ञेने की स्वत:च्या इच्छेने हे जाणण्याची उत्सुकता आहे.'

कौत्स त्याला आपल्या येण्याचे प्रयोजन सांगतो. विद्यादान पूर्ण झाल्यावर 'मी आपणाला काय गुरुदक्षिणा देऊ' असे विचारता कौत्साला त्याच्या गुरूने सांगितले, 'तू माझी निरंतर भक्तिभावाने केलेली सेवा हीच गुरुदक्षिणा... ' परंतु कौत्साचे समाधान न होऊन त्याने काही तरी देण्याचा आग्रहच धरला तेव्हा संतापून वरतन्तूने प्रत्येक शिकवलेल्या विद्येसाठी एक कोटी अशा तऱ्हेने चौदा कोटी सुवर्णमुद्रा आणण्यास सांगितले. इतकी धनराशी एकदम कुठून आणणार? रघूची दानशूरता सुप्रसिद्ध असल्याने कौत्स त्याच्याकडे मदत मागण्यासाठी येतो. परंतु रघूने विश्वजित यज्ञात सर्व काही दान करून टाकले असल्याने मातीच्या भांड्याने कौत्साची पूजा-अर्चना केलेली असते. या निर्धन दात्याकडून अपेक्षापूर्ती होणार नाही असे वाटून कौत्स म्हणतो...

**तदन्यतस्तावदनन्यकार्यो**
**गुर्वर्थमाहर्तुमहं यतिष्ये स्वस्त्यस्तुते**
**निर्गलिताम्बुगर्भ शरद्घनं नार्दति**
**चातकोऽपि ।।**

'गुरूसाठी म्हणून मला हवी असलेली गोष्ट आता मी दुसऱ्या कोणाकडून मागेन. कारण पाणी संपून गेलेल्या शरदाच्या मेघाकडे चातकदेखील याचना करीत नाही.' मात्र, रघू कौत्साला रिक्त हस्ताने जाऊ देत नाही. पृथ्वी जिंकून झाली असल्याने त्याला हवी असलेली धनराशी कुबेराकडून आणायला तो स्वारीची तयारी करतो. परंतु सकाळी त्याला कळते की, रात्री कुबेराने सुवर्णवृष्टी करून रघूच्या हल्ल्याची आवश्यकताच नाहीशी केली. सोन्याचा ढीग चौदा कोटी सुवर्णमुद्रांहून जास्त होता, तरी सर्वच्या सर्व मुद्रा रघूने कौत्साला देऊ केला. कौत्साने गुरुदक्षिणेपुरताच भाग उचलला.

या आख्यानात आपल्याला अनेक आदर्श पाहायला मिळतात. कौत्सासारख्या तरुण स्नातकाला राजदरबारी मिळालेला मान. वरतन्तूची गुरुदक्षिणेची अपेक्षा नसणे. स्वत:चा खजिना रिता असूनही याचकाने रिक्तहस्ताने परत जाऊ नये यासाठी रघूची स्वर्गापर्यंत स्वारीची तयारी हा दातृत्वाचा आदर्श आणि रघूच्या शौर्याचा दबदबा असा की, कुबेराने युद्ध टाळण्यासाठी त्याची अपेक्षा पूर्ण करावी. कुबेराने दिलेल्या संपत्तीचा अपेक्षेपेक्षा जास्त भाग कौत्स आणि रघू दोघांनाही नको होता हा निर्लोभीपणाचा एक आदर्श. आजच्या शिक्षण, राजकीय क्षेत्रात हे आख्यान कसे असेल? वरतन्तूच्या महाविद्यालयाच्या जबरदस्त 'कॅपिटेशन फी' साठी अर्थसहाय्य मागायला आलेल्या कौत्साची दाद मंत्रालयात लागेल का? वशिला लावून दाद लागली तरी राज्य शासनाचा पैसा संपला असल्याने अनुदान देता येत नाही हे उत्तर नोकरशहांकडून मिळेल. त्याने मुख्यमंत्री रघुरावजींकडे मजल मारलीच तर मुख्यमंत्र्यांना त्यासाठी केंद्राकडून पैसे आणायची इच्छा होईल का? झालीच तर त्यांचा केंद्रात इतका दबदबा असेल का की, मुख्यमंत्र्यांनी दिल्लीत ठाण मांडण्यापूर्वीच वित्तमंत्री कुबेरनाथ अनुदान ताबडतोब पाठवतील? गरजेपेक्षा जास्त अनुदान नाकारण्याची सचोटी कोण दाखवू शकेल? पुराणकाळी समाजात, राजदरबारी आणि देवांकडेसुद्धा विद्वानाचा आदर होत असे. आज तशी परिस्थिती नाही. विद्योपेक्षा पैसा, अधिकार मोठे मानले जातात.

अपवाद सोडल्यास आपल्या आजच्या विद्वानांची प्रतिमा अशी आहे का की, समाजाने त्यांना मान द्यावा? विद्येसाठी झटणे, विद्यादानात आनंद मानणे, उत्कृष्टतेची कदर करणे आणि धन-सन्मानांबद्दल नि:स्पृह असणे हे गुण आजच्या किती विद्वानांत आढळतात? राजकारणापासून भारतातील कुठलेही विद्यापीठ मुक्त नाही. राष्ट्रीय संशोधन संस्थांतही अधिकारशाही, लालफीत, आत्मसंतुष्ट वृत्ती आणि निष्क्रियता दिसते. गुरुजनांचा हा आदर्श पाहिला की विद्यार्थीदेखील तोच कित्ता गिरवू पाहतात.

कोणी म्हणेल की, रघू आणि कौत्साचे आख्यान त्रेतायुगातले होते. कलियुगात हे असेच चालायचे. मला हे पटत नाही. आजच्या स्नातकांनी परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे त्यासाठी मी काही आशादायक उदाहरणे मांडणार आहे.

पाच-सहा दशकांपूर्वी केंब्रिज विद्यापीठात गेलो असताना माझी एका सह-अध्यायीशी चर्चा झाली. ब्रिटनमध्ये जातीभेद नसला तरी वर्गभेद आहे असे त्याचे म्हणणे. त्याने ब्रिटनच्या जनतेचे चार वर्ग पाडले. सर्वोच्च वर्ग राजकुटुंबाचा. दुसऱ्या वर्गात राजकीय पुढारी, शासकीय उच्चपदस्थ, उद्योगपती, विद्यापीठातील प्राध्यापक इत्यादी. तिसऱ्यात 'पांढरी कॉलरवाले' आणि दुकानदार तर चौथ्या वर्गात कामगार. मला या गोष्टीचे आश्चर्य वाटले की, त्याने प्राध्यापकांना इतके महत्त्वाचे स्थान दिले. इंग्लंडमधील वास्तव्यात मला त्याची सत्यता पटली. प्राध्यापकांची प्रतिमा तेथील समाजात उज्ज्वल आहे. एखाद्या विषयात काही विशेष घडले तर प्रसारमाध्यमे त्यावर टिप्पणी करण्यासाठी विद्यापीठातील त्या क्षेत्रातील अध्यापकाला बोलावतात. आपल्या विषयावर अधिकारवाणीने बोलणारा अभ्यासक अशी त्याची प्रतिमा असते आणि ती खरीही असते. रशियात नॅशनल अकॅडमीच्या फेलोला 'अति महत्त्वाच्या व्यक्ती' चा बहुमान मिळतो. फ्रेंच अकॅडमी, रॉयल सोसायटी इत्यादी संस्थांना समाजात जी प्रतिष्ठा आहे ती केवळ उत्कृष्टतेमुळे. उत्कृष्टतेचा मार्ग सोपा नसतो. त्यासाठी जिद्द, सचोटी आणि महत्त्वाकांक्षा लागते. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात माऊंट विल्सन वेधशाळेत शंभर इंच व्यासाची एक दुर्बीण बांधली जात होती. त्यासाठी खेचरावरून सामान वाहून नेले जात होते. खेचरे हाकणाऱ्यांपैकी एका अल्पशिक्षित तरुणाला दुर्बिणीबद्दल कुतूहल निर्माण झाले. इतक्या दुर्गम ठिकाणी दुर्बीण बांधायचा अट्टहास कशासाठी? त्यातून काय दिसते? त्याचा अर्थ कसा लावायचा? ... अशा प्रश्नांपायी त्याने खेचरे हाकणे सोडून टेलिस्कोपच्या रखवालदाराची नोकरी पत्करली. तो टेलिस्कोप वापरणाऱ्या खगोलशास्त्रज्ञांना मदत करू लागला. पुढे त्याने स्वत: वेध घेण्यास सुरुवात केली. त्यासाठीचे शिक्षण आत्मसात केले. 'विश्व प्रसरण पावत आहे' हा निष्कर्ष ज्याच्याबरोबर केलेल्या निरीक्षणातून एडविन हबल याने काढला तोच हा मिल्टन हमसन. खगोल निरीक्षणांच्या उत्कृष्टतेने त्याला आकर्षित केले. ही सहजसाध्य गोष्ट होती का? नाही! उत्कृष्टता राबवायला कणखरपणा लागतो. केंब्रिज विद्यापीठाने पाच वर्षांपूर्वी आपला आठशेवा वाढदिवस साजरा केला. या दीर्घकाळात हे विद्यापीठ अग्रस्थान का टिकवून आहे? कारण या विद्यापीठात प्रवेशाचे निकष अवघड आहेत. अधिक गुणवत्ता असल्याशिवाय इथे प्रवेश मिळत नाही. लोकशाहीत सर्वांना सारखी संधी द्यावी. पण विशेष गुणवत्ता असलेल्यांना अधिक शिकायची विशेष सोय उपलब्ध झाली पाहिजे, हे केंब्रिजचे उदाहरण सांगून जाते. आजही आपल्याकडे थोडेफार पण खरे विद्वान आहेत. विज्ञान, कला आणि वाणिज्य या तीनही क्षेत्रांत ज्यांना समाज आदराने वागवतो. त्यामुळे उत्कृष्टतेची कदर करण्याइतकी जाण समाजात आहे, ही जमेची गोष्ट. अशा विद्वानांपैकी एखादा गुरू म्हणून लाभणे हे विद्यार्थ्यांचे भाग्य म्हटले पाहिजे. आज अशा गुरुजनांची आठवण ठेवा. कारण स्नातक पदवीच्या रूपाने गुणवत्ता मिळवतो त्यामागे गुरुजनांची पुण्याई असते. ज्यांनी उत्कृष्टतेचे ध्येय ठेवले असेल, ज्यांनी त्या ध्येयाच्या दिशेने थोडी फार मजल मारली असेल आणि जे त्या पुढेही जाऊ इच्छितात, अशांना मी सुयश चिंतितो. हा मार्ग सोपा नाही. पण तो सोडू नये. बाकीच्यांना एवढीच विनंती की, त्यांनी उत्कृष्टतेच्या मार्गाने जाणाऱ्यांची कदर करावी, त्यांना मागे खेचू नये.

# तन्मय पारखचे 99.40 टक्के मार्क प्राप्त करुन नेत्रदीपक सुयश

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

कासारे जि.धुळे येथील भूमिपुत्र व कुंथलगिरी येथील देशभूषण कुलभूषण माध्यमिकविद्यालयाचा विद्यार्थी चि. तन्मय बन्सीलाल पारख- जैन यांनी एस एस सी दहावीच्या बोर्ड परीक्षेत शेकडा ९९.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाचे नेत्रदीपक सुयश संपादन केले . आपल्या परिवाराचे जन्मभूमीचे, विद्यालयाचे नाव रोशन केले .चि. तन्मय पारख हा मुलुख मैदान नामांकित वृत्तपत्राचे संस्थापक संपादक स्व. अशोक जैन तसेच उद्योजक स्व.राजमल पारख



,स्व.रमणलाल पारख कासारे चे उद्योगपती श्री वालचंद पारख, प्रवासीमहासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेश पारख, भारतीय जैन संघटनेचे मा. जिल्हाध्यक्ष डॉ. हेमंत पारख,धुळ्याचे ज्येष्ठ पत्रकार पुखराज पारख , निखिल पारख, गौरव पारख , कासारे चेसामाजिक कार्यकर्ते डॉ हिरालाल पारख, मा. जी. प. सदस्य मोहन भाऊ जैन खापरचे लुणकरण पारख यांचे पुतणे असून कुंथलगिरी येथील देशभूषण कुलभूषण माध्यमिक विद्यालयाचे कृतिशील शिक्षक प्रा. बन्सीलाल गणेशमल जैन - पारख यांचे ज्येष्ठ सुपुत्र आहेत .चि. तन्मय पारख च्या सुयशाबद्दल कासारेचे समस्त ग्रामस्थ, जैन श्री संघ व सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे व पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# महानगर बँकेच्या उभारणीत शेळके पिता पुत्रांचे मोठे योगदान :- अध्यक्षा, सुमनताई गुलाबराव शेळके

## शेळके परिवारातील फुट वेदनादायी

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

जी एस महानगर बँकेच्या उभारणी पासून ते आतापर्यंत च्या वाटचालीत बँकेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत सॉलिसिटर गुलाबराव शेळके व ॲड . उदयराव शेळके यांचे मोठे योगदान असून ते कधी ही व कोणी ही नाकारू शकत नाही , या सर्व घडामोडींची मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून बँकेच्या निवडणूकी वरून शेळके कुटुंबात पडलेली फुट माझ्या दृष्टीने माझ्या ह्यातीतील सर्वांत मोठी वेदनादायी बाब आहे , असे स्पष्ट प्रतिपादन व वेदना बँकेच्या विद्यमान अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी व्यक्त केल्या .



अध्यक्षा सुमनताई शेळके पुढे म्हणाल्या की , जी एस महानगर बँकेची स्थापना सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने केली , गेल्या ५० वर्षांमध्ये बँकेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे . बँकेच्या प्रगतीच्या प्रवासात माझे पती सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब आणि माझा मुलगा ॲड उदयराव शेळके यांची आहुती गेली , तरीही मी माझे सर्व दुःख बाजूला सारून समाजासाठी बँकेचे सभासद , ठेवीदार आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी ठामपणे उभे राहून बँकेची प्रगती साधली . आज आपली बँक भक्कमपणे पाय रोवून उभी आहे . तसेच गेले २ वर्षे मी आपल्या जीएस महानगर बँकेला सुदृढ बँकेचा दर्जा प्राप्त करून दिला आहे , हे सर्व केवळ दिवंगत गुलाबराव शेळके साहेब यांच्या प्रामाणिक विचारामुळे शक्य झाले आहे .

आज मी पुन्हा अजून एक अशा आव्हानाला सामोरे जात आहे . महानगर बँकेच्या सध्याच्या निवडणुकीत अत्यंत खालच्या स्तरावर घडामोडी घडल्या आहेत . घरातीलच काही सदस्यांनी बंड केल्यामुळे आणि काही संचालकांनी मला वचन दिले , तरीही त्यांनी माझ्याशी धोका केला , तसेच काही अतृप्त शक्तींनी या सर्व घडामोडींना खतपाणी घातल्यामुळे मागील ५० वर्षांमध्ये कधीही न पाहिलेले वाईट चित्र या निवडणुकीत दिसत आहे . ही निवडणूक खोटेपणाने माझ्या मुलीवर झालेल्या वैयक्तिक हल्ल्यांनी संचालक मंडळातील फुटींमुळे शेळके परिवार कुटुंबाची सार्वजनिक फाटा फुट आणि प्रतिष्ठेचे संपूर्ण नुकसान झालेले आहे . ही फक्त निवडणूक नाही , तर आमच्या कुटुंबाची वेदनादायी फुट आहे . जी सार्वजनिक पणे उघड होत आहे .

मी आजपर्यंत बँकेच्या निवडणूक प्रचाराला सुरुवात केली नव्हती , कारण माझी सदैव इच्छा होती की , ही निवडणूक बिनविरोधपणे पार पाडावी , शेळके विरुद्ध शेळके असा संघर्ष होऊ नये आणि बँकेची प्रतिष्ठा आबाधित राहावी , दुर्दैवाने सर्व प्रयत्न करूनही निवडणूक मात्र आमच्या नियंत्रणाबाहेर गेली , त्या परिस्थितीमुळे आम्हाला सामूहिक निर्णय घेण्यासाठी पुढील वेळ किंवा संधी मिळू शकली नाही . आमच्या काही उमेदवारांनी अगदी शेवटच्या क्षणी पाठ फिरवणे . हे माझ्या दृष्टीने पुर्ण पणे अनपेक्षित होते . त्यामुळे आम्हाला योग्य वेळी औपचारिक प्रतिसाद देणे शक्य झाले नाही .आमच्या पॅनलचे उमेदवारां वर आता ही दबाव आणून फोडण्याचा प्रयत्न केला जात आहे ,अशी गोष्ट मी कधीच अपेक्षित धरली नव्हती . या गोष्टी ने मला खूप खोल वेदना झाल्या आहेत . परिणामी निवडणूक प्रक्रिया पुढे सरकले आहे , आमच्या पॅनलला निवडणूक चिन्ह रिक्षा मिळाले आहे . भावनिक दृष्ट्या मी हेही मान्य करते की, या निवडणूक लढाईत मला पूर्वीसारखा उत्साह टिकवणे , आता माझ्यासाठी कठीण झाले आहे आणि सध्याच्या परिस्थितीत सुरू असलेल्या अपप्रचारांनी मला अतिशय त्रास झाला आहे , तरीदेखील प्रक्रिया सुरू झाली आहे . मी आपल्या बँकेच्या सभासदांच्या विचार संपत्तीवर पूर्ण विश्वास ठेवून आपल्याला विनम्र आवाहन करते की , आपण लोकशाही प्रक्रियेचे पालन करून आपला मताधिकार बजावा आणि माझ्या नेतृत्वाखालील संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व श्रीमती सुमनताई गुलाबराव शेळके पॅनलला मतदान करावे .

सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब यांच्या वारसाचा मान राखणाऱ्या या संस्थेचे भवितव्य जपण्यासाठी माझ्या पॅनलच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करावे , जी एस महानगर बँक परिवाराचे सर्व सभासद , खातेदार , ठेवीदार , कर्मचारी आणि हितचिंतक यांचे प्रेम व पाठिंबा मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने मी त्यांचे मनःपूर्वक आभारी आहे , असे ही अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांनी सांगितले.

# खत बियाणे खरेदीत शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवा.. कैलास येसगे कावळगावकर

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
----------------------

खरीप हंगामाची लगबग सुरू होताच शेतकऱ्यांची खत बियाणे खरेदीसाठी धावपळ सुरू होते. याचाच फायदा घेऊन कृषी सेवा केंद्रावर व्यापारी लोक चढ्या दराने खत बियाणांची विक्री करतात. तालुक्यातील शेतकऱ्यांकडून आलेल्या तक्रारीची दखल घेऊन शेतकरी नेते, काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर यांच्या



नेतृत्वाखाली तहसीलदार भरतजी सूर्यवंशी यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये प्रामुख्याने कृषी व महसूल विभागातील अधिकाऱ्यांची एक पथक नेमून कृत्रिम टंचाई करून वाढीव दराने खत बियाणे विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर तात्काळ कार्यवाही करावे, तसेच बोगस खत बियाणे उपलब्ध करून देणाऱ्या कारखान्यांचे लायसन्स रद्द करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी व अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा या मागण्या मांडण्यात आल्या. तहसीलदार भरतजी सूर्यवंशी यांनी याबाबत तात्काळ कार्यवाही करत कृषी अधिकारी यांच्याशी चर्चा करून पथक नेमण्याच्या सूचना केल्या. याप्रसंगी कैलास येसगे यांच्यासह बसवंत पटणे, गंगाधर आऊलवार, माधव लगडे, वैजनाथ शिवपुजे, नागनाथ आऊलवार, मारुती पाशमवार, हाणमंत राजुरे, सिद्धार्थ ढवळे, योगेश सूर्यवंशी, बस्वराज डांमरंचे, सूर्यकांत मजगे, सुभाष सोनकांबळे व देगलूर तालुक्यातील अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

PASSWORD PROTECTED PAGE